अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | गुरुवार, दि. २७ जुलै २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २९८ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात आज पहिला वनडे सामना

सुराज्य/बार्बाडोस

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील एकदिवसीय मालिका आजपासून सुरू होत आहे. आगामी विश्वचषक आणि आशिया कपच्या दृष्टीने ही मालिका टीम इंडियासाठी महत्त्वाची आहे.

या मालिकेत असे अनेक खेळाडू आहेत ज्यांना आशिया चषकापूर्वी स्वत:ला सिद्ध करायचे आहे. प्लेइंग ११ मध्ये कोणाला संधी मिळेल? त्याची कामगिरी ही टीम इंडियासाठी




महत्त्वाची असेल. आशिया चषकापूर्वी भारतीय संघाची ही शेवटची एकदिवसीय मालिका आहे. भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील पहिला वन डे सामना २७ जुलै रोजी बार्बाडोस येथे खेळवला जाणार आहे. दुसरा सामना २९ रोजी आणि शेवटची वन डे १ ऑगस्ट रोजी होईल. रोहित शर्मा आणि शाई होप कर्णधार म्हणून आमनेसामने असतील. या मालिकेत कोणाला संधी द्यायची हे रोहित शर्मा आणि संघ व्यवस्थापन ठरवणार आहेत. पहिले आशिया चषकासाठी विचार केला जात असून त्यानुसार प्लेइंग ११ मध्ये संधी देण्यात येणार आहे. विश्वचषकाची तयारी म्हणूनही पाहिले जात आहे. वेस्ट इंडिज ला यावेळी वर्ल्डकपमध्ये स्थान मिळवता आले नाही.

# तमाशात मुलींना 'नो एन्ट्री' डीजेलाही दाखवली 'काठी'

- मोडनिंबमधील महासंघाच्या बैठकीत झाला निर्णय
- महिला कलावंतांचा मात्र कडाडून विरोध

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रात लोककला म्हणून ख्याती असलेली तमाशाची कला जिवंत ठेवण्याचा अटोकाट प्रयत्न जुन्या पिढीतील कलावंत आजही करत आहेत.राज्यात प.महाराष्ट्र व मराठवाड्यात आजही तमाशा कला केंद्र पहायला मिळतात.लावणी रसिक आजही दूरवर जाऊन लावणी,ढोलकी आणि घुंगरूचा आनंद घेत असतात पण ही रसिकता हरपत चालली असून तमाशा केंद्रांना आता डान्स बारची कीड लागली आहे. तिथे आंबट शौकिनांची गर्दी वाढू लागली आहे. या साऱ्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ कलावंतांनी चिंता व्यक्त केली असून आता यापुढे तमाशा कला केंद्रात अठरा वर्षाच्या मुलींना लावणी सादर करण्यासाठी उभे करू नये आणि डीजेलाही कला केंद्रात बंदी आणावी,असा महत्त्वपूर्ण निर्णय तमाशा कलावंत,कलाकेंद्र,कलाकार आणि केंद्र मालकांच्या बैठकीत घेण्यात आला.**



सोलापूर जिल्ह्यातील तमाशा कलेचे माहेरघर असलेल्या माढा तालुक्यातील मोडनिंब येथे ही राज्यस्तरीय बैठक नुकतीच झाली. राज्यातील लावणी आणि तमाशा कलावंतांना येणाऱ्या अडचणींवर चर्चा करण्यासाठी राज्यातील सर्व तमाशा केंद्र, लावणी कलाकेंद्र येथील कलाकार, वादक, गायक आणि थिएटर मालक या बैठकीला उपस्थित होते. महाराष्ट्र संगीत पार्टी तमाशा कलावंत महासंघाचे अध्यक्ष अरुण मुसळे यांच्या पुढाकाराने या बैठकीचं आयोजन करण्यात आले होते.या बैठकीमध्ये अठरा वर्षाच्या खालील मुलींना तमाशा केंद्रात कलावंत म्हणून आपली कला सादर करता येणार नाही आणि तमाशा, संगीत पार्ट्यांमध्ये डीजेला बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आला.

शासकीय नियमानुसार, १८ वर्षांखालील मुलींना कला केंद्रात कला सादर करणे गुन्हा ठरत असल्याने याबाबत निर्णय घेण्यात आला. त्यामुळे १८ वर्षांपेक्षा लहान मुलगी कला केंद्रात नको अशी भूमिका जाहीर करण्यात आली. याशिवाय डीजेमुळे पारंपरिक वादक आणि गायकांच्या पोटावर पाय येणार असल्याने डीजेवर देखील बंदी घालण्यात आल्याचे वसंत गाडे यांनी सांगितले. या निर्णयाला काही कलाकारांनी आक्षेप घेत हा निर्णय चुकीचा असल्याचं सांगितलं.या लहान मुलींना नाचण्याचे आणि गायनाचे शिक्षण दिल्याशिवाय त्या स्टेजवर कशा कला सादर करणार? अशी विचारणा यावेळी लावणी कलावंतांनी केली. या लहान मुलींना नृत्याचे शिक्षण याच कला केंद्रात द्यावे लागते आणि त्या तयार झाल्यानंतर १८ वर्षानंतर त्यांना स्टेजवर कला सादर करायला पाठवले जातं, अशी भूमिका ज्येष्ठ लावणी कलावंत उमा इस्लामपूरकर यांनी मांडली. कोणत्याही कलाकेंद्रात १८ वर्षांपेक्षा लहान मुली स्टेजवर येणार नसल्या तरी त्यांना तयार करायला त्यांना कला केंद्रात यावेच लागेल, असे वैशाली वाफळकर यांनी सांगितले. या बैठकीतून आमचे प्रश्न सुटले असे वाटत नसल्याचे सांगताना आमच्या मुलांच्या शिक्षणासाठी शासनाने पुढाकार घेऊन त्यांना राहण्यासाठी शहरात वसतिगृह असली तर ते शिक्षण घेतील, असा दावा वैशाली यांनी केला.

### कोण गौतमी पाटील?

सध्या आमच्या समाजातील केवळ ५ टक्के मुली परिस्थितीमुळे कला केंद्रात असून बाकीच्यांची मुले चांगले शिक्षण घेऊन डॉक्टर आणि अधिकारी बनत आहेत. फक्त शासनाने आमच्या मुलांना शिक्षणासाठी पाठबळ दिले तर आमचे प्रश्न सुटतील, असा दावाही यावेळी वैशाली वाफळकर यांनी केला. यावेळी बोलताना कोण गौतमी पाटील असा सवाल करत अश्लील नृत्य करून ती काय करते सगळ्यांना माहित आहे, असे सांगत ५ किलोची घुंगरं पायात बांधून आणि नखशिखांत कपड्याने झाकून आम्ही आमची कला सादर करतो, असे सांगत या कलावंतांनी गौतमी पाटीलवर देखील निशाणा साधला.

### आंबट शौकिनांचा विळखा...

तमाशा कला केंद्रांमध्ये सांस्कृतिक परंपरा व शालिनता जपली जात होती परंतु आता आंबट शौकिनांचा या केंद्रांना विळखा पडत चालला आहे.तमाशा केंद्रात नोकरी देतो म्हणून अल्पवयीन मुलींना आणले जात आहे.तिथे डान्स बार पद्धतीचे नृत्य करायला लावून हे आंबट शौकिन पैसा कमावू लागले आहेत.त्यात या अल्पवयीन मुलींवर अत्याचार होत असल्याचे प्रकारही उघडकीस आले.या विकृतीला आळा घालण्यासाठी महासंघाची भूमिका योग्य असल्याची प्रतिक्रिया लोककलेतील कलावंतांनी सुराज्यशी बोलताना दिली.

## बनावट करारनामा करुन फसवणूक; माजी नगरसेवक श्रीनिवास करलींवर गुन्हा

**सोलापूर :** जागेचे स्वत: मालक असल्याचे खोटे भासवत खोटे करारपत्र देऊन ५० ते ६० नागरिकांना नोटरींद्वारे करारनामा करून त्यांना फसवल्याप्रकरणी माजी नगरसेवक श्रीनिवास आशप्पा करली (रा.श्रमजीवी नगर, मजरेवाडी) यांच्यावर गुन्हा दाखल झाला.



याबाबत सुप्रिया राजेंद्र नेर्ली (वय-५४, रा.दर्गा रोड, बेळगावी) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी सुप्रिया नेर्ली यांच्या वडिलांच्या मालकीची मजरेवाडी येथे शेत जमीन होती. वडिलांच्या निधनानंतर त्या जमिनीवर फिर्यादी व त्यांच्या बहिणींचा हक्क आहे. काही दिवसांपूर्वी त्या जागेवर पाहणी करताना तेथे काही लोक पत्राशेड व बांधकाम करत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी चौकशी केल्यानंतर करली यांनी त्या जागेचे नरसिंग नगर असे नाव ठेवत स्वत: मालक असल्याचे भासवून ती जागा ५० ते ६० जणांना खरेदीकरार नामा करून दिला. शिवाय कब्जा पावती देऊन खोटे करारपत्र तयार करून ती जागा विकून फिर्यादीची व विकत घेणाऱ्या नागरिकांची फसवणूक केली, अशा आशयाची फिर्याद नेर्ली यांनी दिली आहे. एम.आय.डी.सी पोलिसांनी करली यांना ताब्यात घेतले असून, सोलापूर न्यायालयात हजर केले असता त्यांना ३ दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली असल्याचे तपास अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक चौधरी यांनी सांगितले.

## पोपळज येथे विवाहितेचा खून; दोन महिन्यानंतर पती आणि सासूवर गुन्हा

**सोलापूर :** पत्नीला मारहाण करून खून केला. त्यानंतर मृतदेह पोफळज (ता.करमाळा) येथील रेल्वे रुळावर टाकून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला होता. तब्बल दोन महिन्यानंतर करमाळ्याच्या पोलिसांनी मयताचा पती आणि सासू विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. रुक्मिणी संजय बिचींतकर (वय ४५ रा. जवळा ता.जामखेड) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे.




याप्रकरणी करमाळ्याच्या पोलिसांनी तिचा पती संजय नरहरी बिचितकर (वय ५१ ) आणि सासू सुजनबाई बिचींतकर (वय ८० दोघे रा. जवळा) या दोघांविरुद्ध खून करून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. यासंदर्भात मयताची आई गीताबाई संजय सरडे (वय ७२ रा.जवळा ता.जामखेड) यांनी करमाळा न्यायालयात तक्रार दाखल केली होती. दि. २५ मे रोजी सायंकाळ ते दुसऱ्या दिवशी पहाटेच्या दरम्यान संजय आणि त्याची आई सुजनबाई बिचींतकर या दोघांनी मिळून रुक्मिणीला मारहाण करून तिचा खून केला. असे फिर्यादीत नमूद आहे. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे पोलिसांनी दोघा जणांवर नुकताच गुन्हा दाखल केला. सहाय्यक निरीक्षक टिळेकर तपास करीत आहेत.

## पीएम किसान योजनेचे २ हजार रुपये आज मिळणार

सुराज्य/सोलापूर

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत चौदाव्या हप्त्याचा एप्रिल ते जुलै २०२३ या कालावधीचा देय लाभ देशातील लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात गुरुवार २७ जुलै प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाइन वितरित होणार आहे. सोलापूर जिल्ह्यातील पीएम किसान योजनेचे तब्बल ५ लाख ४९ हजार लाभार्थी आहेत. यांच्या खात्यावर दोन हजार रुपये जमा होणार आहे.

**सोलापूर जिल्ह्यात ५ लाख ४९ हजार लाभार्थी**

शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्न मिळण्याकरिता केंद्र शासनाने पीएम किसान योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत सरसकट सर्व पात्र शेतकरी कुटुंबास पती, पत्नी व त्यांची १८ वर्षाखालील अपत्ये यांना २ हजार रुपये प्रती हप्ता या प्रमाणे तीन समान हप्त्यात प्रती वर्षी ६ हजार रुपये लाभ दिला जातो.

२७ जुलै रोजी राज्यातील ८५ लाख ६६ हजार पात्र लाभार्थी शेतकऱ्यांना साधारणत:: १ हजार ८६६ कोटी ४० लाख रुपये इतका लाभ थेट त्यांच्या बँक खात्यात हस्तांतरित करण्यात येणार आहे. राज्यातील ८८ लाख ९२ हजार लाभार्थ्यांचे बँक खाते आधार संलग्न लाभ घेण्यासाठी नोंदणीकृत झाले आहेत. सोलापूर जिल्ह्यात ५ लाख ५८ हजार ८२९ शेतकरी आहे. त्यापैकी या योजनेचा लाभ ३ लाख ४९ हजार ४९३ शेतकऱ्यांना मिळणार आहे. चौदाव्या हप्त्याची हस्तांतरित करावयाची रक्कम शेतकऱ्यांना खरीप हंगामात बियाणे, खते, औषधे सारख्या कृषी निविष्ठा खरेदी करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.

## दोन वाहनाच्या धडकेत आठ भाविक जखमी

सुराज्य/पंढरपूर

चंद्रभागा नदीच्या पैलतिरावर असणाऱ्या तीन रस्ता येथे बुधवार, २६ जुलै रोजी मिनी बस आणि पीकअप वाहनाची समोरासमोर धडक झाल्याने या अपघातामध्ये मिनी बस पलटी होवून आठ भाविक जखमी झाले.



याबाबत तालुका पोलीस ठण्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी सकाळी ७ वाजता सोलापूर रोडवरील तीन रस्ता परिसरात एमएच १७ - बीडी ६३०० ही मिनी बस आणि एमएच ०३ एएच ९४१३ या पीक अप जीप या वाहनात जोरदार धडक होऊन मिनी बस पलटी झाल्याने बसमधील ८ भाविक जखमी झाले आहेत. हे भाविक अहमदनगर जिल्ह्यातील शिर्डी येथील असून पंढरपूर येथे श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन घेऊन ते पुढे तुळजापूरकडे निघाले होती. गणेश चांगदेव जेजुरकर. (रा.शिर्डी, जि. अहमदनगर) यांनी पंढरपूर तालुका पोलिस ठाण्यात पीकअप चालकाच्या विरोधात फिर्याद दाखल केली आहे. मिनी बस चालक संजय बनकर याने जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. या अपघातात ८ भाविक जखमी झाले आहेत.

### राष्ट्रवादी कोणाची?

## निवडणूक आयोगाची काका-पुतण्याला नोटीस

सुराज्य/मुंबई

अजित पवार उपमुख्यमंत्री पदाची आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील ८ आमदारांनी मंत्री पदाची शपथ घेत शिंदे-फडणवीस सरकारमध्ये सामील झाले. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात भूकंप झाला. यानंतर अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर दावा केला आहे, मात्र शरद पवार यांनी त्यांचा दावा फेटाळून पुन्हा एकदा पक्षाची उभारणी करण्यास सुरूवात केली.


दरम्यान, दोन्ही गटांकडून खरा पक्ष असल्याचा दावा करत भारतीय निवडणूक आयोगाकडे कागदपत्र सादर केली आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाने दोन्ही गटांना उत्तरासाठी ३ आठवड्यांची मुदत दिली आहे. अजित पवार यांनी



राष्ट्रवादीमधून बंडखोरी केल्यानंतर राष्ट्रवादीचे अध्यक्षपद, बहुतांश आमदार, पदाधिकारी आमच्यासोबत असून राष्ट्रवादी पक्ष आम्हाला देण्यात यावा, अशी याचिका निवडणूक आयोगाकडे दाखल केली होती. या बंडानंतर शरद पवार गटानेही तातडीने हालचाली करत निवडणूक आयोगाकडे धाव घेतली होती. दरम्यान, दोन्ही गटांकडून खरा पक्ष असल्याचा दावा करत निवडणूक आयोगाकडे कागदपत्र सादर करण्यात आली आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आज खुश तो बहोत होंगे तुम !!!

कल्याण
224-83-157

मेन बाजार
246-24-239

# जिल्ह्यातील अवैध गर्भपातांचे केंद्रस्थान बार्शी?

सुराज्य/बार्शी

नुकतेच बार्शी शहरात अवैध गर्भपात सुरू असलेल्या ठिकाणी धाड टाकून बार्शी पोलिसांनी पुराव्यासह आरोपी पकडले आहेत. यापूर्वी स्वामी नावाच्या तोतया डॉक्टरने फिरते गर्भलिंग निदान चाचणी मशीनद्वारे अनेक महिलांकडून पैसे उकळल्याचे ही प्रकरण उजेडात आले होते. भूम येथे आपल्या या अवैध व्यवसायातील हस्तकाच्या आत्महत्येला कारणीभूत ठरल्या प्रकरणी त्याच्यावर गुन्हा ही दाखल झाला होता. बार्शी शहरात नुकतेच उजेडात आलेले हे अवैध गर्भपात केंद्र हे अशा घटनांचे जिल्हयातले केंद्रस्थान आहे का ? याचा सखोल तपास होणे गरजेचं आहे. या प्रकरणाचा पोलीस निरीक्षक संतोष गिरीगोसावी यांनी तत्परतेने तपास केला असून पाच आरोपींना अटकही केली आहे.

मात्र केवळ या एका घटनेभोवती तपास मर्यादित न राहता या प्रकरणात सामील दलालांची संख्या नेमकी किती आहे ? हे दलाल केवळ सोलापूर जिल्ह्यातीलच आहेत की इतर जिल्ह्यामध्येही या दलालांची साखळी आहे. याची चौकशी झाली पाहिजे. या अवैध गर्भपातांपूर्वी गर्भलिंग निदान चाचण्या केल्या जात होत्या, या अगदी सूर्यप्रकाशा इतके स्वच्छ आणि स्पष्ट आहे. मात्र केवळ गर्भलिंग निदानपासून मशीन हाताळणाऱ्या



व्यक्ती या वैद्यकीय क्षेत्रातील प्रशिक्षित कर्मचारी आहेत, की त्यांना इतर कोणत्या वैद्यकीय यंत्रणेचे अनधिकृतरित्या पाठबळ लागते आहे. याचाही विचार होणे गरजेचे आहे. आज ही गर्भलिंग निदान चाचणी करून घेण्याची मानसिकता समाजामध्ये रूढ झालेली आहे, ही वस्तुस्थिती आहे, आणि अशा मानसिकतेमधून स्त्रीभ्रूणहत्या केल्या जातात. आणि त्यामुळे अशा अवैध चाचण्या करून घेण्यासाठी ग्राहक मोठ्या संख्येने सहजा-सहजी उपलब्ध होत असतात. हे कटूसत्य आहे. मात्र या गैरप्रकारांना कदापिही समाज मान्यता मिळता कामा नये. यासाठी कायद्याच्या बडग्याचीच गरज आहे. बीड जिल्ह्यातील मुंडे दांपत्याने याबाबत कहर आणि कळस केला होता.

बार्शी सारख्या शिक्षण, आणि आरोग्य संस्कृतीचे जिल्ह्यातील माहेरघर असलेल्या शहरामध्ये या विकृती मुळापासून उपटून टाकण्याची गरज आहे. तसेच हे अवैध गर्भपात केवळ विवाहित महिलांचेच स्त्रीभ्रूण ओळखून केले जात होते. की वेगवेगळ्या लैंगिक, अत्याचार, बलात्कार, व अन्य शारीरिक शोषण चक्रव्यूहात सापडलेल्या अल्पवयीन मुली, युवती, व महिला यांच्या अवैध गर्भपातांच्या घटनांशी ही साखळी जोडली गेली होती का? याचा ही मुळापासून तपास होण्याची गरज आहे.